Epaper
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १४८ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

**» Selected**

### अशोक खरात सारख्याचा बापाचाही मी बाप

सांगोला : अशोक खरातवर चित्रीत होत असणाऱ्या महाराष्ट्रा एल्फिन्स्टन फाईल या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये एक घोटाळा झाला आहे. अशोक खरात सांगोला तालुक्यात येऊन पूजा करून गेला आहे. उघडे नागड्या पद्धतीने धिंगाणा घालून सांगोला येथील जवळ्याकडे पूजा केली आणि माझा भाचा असणाऱ्या अतुल पवारला निवडणुकीत पराभूत करून जीवे मारण्याची पूजा केली. मात्र, मी माझ्या भाच्याला सांगितले. तुझा मामा या महाराजाच्या बापाचा बाप आहे. तू मरत नाही, काळजी करू नको.सांगोला येथे शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी मंत्री भरत गोगावले , मंत्री योगेश कदम , दिपाली सय्यद उपस्थित होत्या. यावेळी दिपाली सय्यद यांना उद्देशून शहाजी बापू पाटील यांनी सांगोल्यातील अशोक खरातचे कारनामे सांगून माजी आमदार दीपक साळुंखे यांना टोल लगावलाय.

## भरत गोगावले यांच्या वक्तव्याने खळबळ! ‘आता सांगत नाही, म्हणत राजकीय सस्पेन्स वाढवला

# राज्यात लवकरच नवे ‘ऑपरेशन टायगर’

### मंत्र्यांनी ठेवला सस्पेन्स कायम | शिंदे गटाच्या पुढील राजकीय खेळीची चर्चा

**जन सम्राट टाईम्स**

**सांगोला । महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा ‘ऑपरेशन टायगर’ची चर्चा रंगली आहे. शिवसेना (शिंदे गट) नेते आणि राज्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी राज्यात लवकरच आणखी एक मोठे राजकीय ‘ऑपरेशन’ होणार असल्याचा सूचक दावा केला आहे. विशेष म्हणजे, हे ऑपरेशन नेमके कोणत्या पक्षातील नेत्यांसाठी किंवा कोणत्या राजकीय गटाला लक्ष्य करून केले.**

जाणार, याचा खुलासा त्यांनी केला नाही. त्यामुळे गोगावले यांच्या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.सांगोला येथे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पुढाकाराने शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधित करताना भरत गोगावले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय रणनीतीचा उल्लेख केला. “एकनाथ शिंदे ऑपरेशन टायगर करतात. ते कुणाला कळत नाही,” असे म्हणत त्यांनी शिंदे यांच्या राजकीय हालचालींचा अंदाज विरोधकांना येत नसल्याचे सूचित केले. यानंतर गोगावले यांनी



केलेल्या आणखी एका वक्तव्याने या चर्चेला अधिकच हवा मिळाली. “लवकरच राज्यात दुसरे एक ऑपरेशन आहे. आता सांगत नाही, नाहीतर मीडिया बातम्या करेल,” असे गोगावले यांनी मिश्किल अंदाजात म्हटले.
त्यामुळे आगामी काळात शिवसेना (शिंदे गट) पुन्हा एखादी मोठी राजकीय खेळी करण्याच्या तयारीत आहे का, असा सवाल उपस्थित झाला आहे.
मात्र, या संभाव्य ‘ऑपरेशन टायगर’मध्ये कोण सहभागी होणार, कोणत्या पक्षातील नेते किंवा आमदार-खासदार शिंदे गटाच्या संपर्कात आहेत किंवा कोणता राजकीय गट फुटण्याची शक्यता आहे, याबाबत गोगावले यांनी कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नाही. त्यांच्या या सूचक विधानामुळे “शिंदेंच्या टार्गेटवर नेमके कोण?” हा प्रश्न सध्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. शिवसेना (शिंदे गट)कडून यापूर्वीही ‘ऑपरेशन टायगर’चा उल्लेख करण्यात आला होता. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (ठाकरे गट)मधील काही खासदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर या राजकीय घडामोडींना ‘ऑपरेशन टायगर’ असे संबोधले गेले.

### आमदारांनंतर आता कोण?

शिंदे गटातील काही नेत्यांकडून यापूर्वी ठाकरे गटातील आणखी काही नेते आणि आमदार शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करू शकतात, असे दावे केले गेले आहेत. त्यामुळे गोगावले यांच्या नव्या विधानाचा संबंध ठाकरे गटाशी आहे का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, हे केवळ राजकीय संकेत आहेत की प्रत्यक्षात एखादी मोठी पक्षांतराची मोहीम आकार घेत आहे, हे आगामी काळातच स्पष्ट होणार आहे. सध्या तरी गोगावले यांनी ‘ऑपरेशन’ची घोषणा न करता त्याची केवळ झलक दाखवली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात या ‘ऑपरेशन टायगर’चा पुढचा पंजा कुणावर पडणार, याची उत्सुकता वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा ‘ऑपरेशन टायगर’चा उल्लेख झाल्याने राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्यातील बदलते राजकीय समीकरण पाहता, गोगावले यांच्या विधानाकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

## ‘हिंसाचार योग्य नाही; उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरे करा’; डीजेच्या मुद्द्यावर फडणवीसांचा स्पष्ट संदेश

### विद्यानंद बापट मारहाण प्रकरणाचा मुख्यमंत्र्यांकडून निषेध; ‘कायद्याबरोबरच लोकांना विश्वासात घेऊन मार्ग काढणे गरजेचे’

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे | प्रतिनिधी:** विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निषेध केला असून, कोणत्याही मुद्द्यावर मतभेद असले तरी हिंसाचाराला समर्थन देता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. प्रत्येकाला आपला मुद्दा मांडण्याचा अधिकार असून, वेगवेगळे विचार असू शकतात; मात्र प्रश्न सोडविण्यासाठी संवाद आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.पुणे दौऱ्यावर असताना माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांना विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर फडणवीस यांनी, झालेल्या घटनेचा आपण यापूर्वीच निषेध केल्याचे स्पष्ट केले. “प्रत्येकाचा दृष्टीकोन असतो. वेगवेगळे विचार असू शकतात. काही या बाजूचे, काही त्या बाजूचे लोक असू शकतात. पण हिंसाचार योग्य नाही. प्रत्येकाने आपला मुद्दा मांडला पाहिजे,” असे त्यांनी सांगितले. यावेळी गणेशोत्सव आणि अन्य सण-उत्सवांच्या आयोजनाबाबतही मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची भूमिका मांडली. वर्षानुवर्षे चालत आलेले सण शक्य तितक्या पारंपरिक पद्धतीने साजरे करता आले, तर त्याचे महत्त्व अधिक वाढते. मात्र, काळानुसार काही पद्धती प्रचलित झाल्या असतील आणि त्यामध्ये बदल करण्याची गरज असेल, तर केवळ कायद्याचा बडगा उगारून त्या बंद करण्याऐवजी लोकांना विश्वासात घेऊन मार्ग काढणे अधिक गरजेचे असल्याचे फडणवीस यांनी



नमूद केले. डीजेच्या आवाजावर नियंत्रणासाठी संवादाचा मार्ग गणेशोत्सवातील डीजेच्या वाढत्या आवाजाबाबतही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट संकेत दिले. कायद्याचा वापर करावा लागतो, कारण काही गोष्टी केवळ चर्चेने बंद होत नाहीत. मात्र, त्यासोबत लोकांना विश्वासात घेणे आणि सामंजस्यातून तोडगा काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. फडणवीस यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त यांच्याशी चर्चा झाल्याचे सांगितले. या चर्चेदरम्यान त्रासदायक ध्वनिप्रदूषणासंदर्भातील अनेक मुद्द्यांवर सर्वांचे जवळपास एकमत होत असल्याचे पोलिसांनी सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः प्रचंड मोठ्या आवाजातील डीजेमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. “पुण्यात गणेशोत्सव असेल किंवा इतर सर्व उत्सव असतील, ते चांगल्या पारंपरिक पद्धतीने साजरे होताना दिसतील,” अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. लोकांच्या सहभागातून डीजेचे ‘स्तोम’ कमी होऊन ध्वनिप्रदूषणाला आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ‘डीजेबाबत पॉलिसी एकदम तयार होत नाही’ डीजेच्या वापराबाबत स्वतंत्र धोरण तयार करणार का, या प्रश्नावर फडणवीस यांनी घाईने निर्णय घेण्याऐवजी चर्चेतून व्यापक सहमती निर्माण करण्यावर भर दिला. “पॉलिसी एकदम तयार होत नाही. अनुभव असा आहे की, सर्व ठिकाणी चर्चेतून ९० ते ९५ टक्के लोक तयार होतात. मग आदेश काढता येतो,” असे त्यांनी स्पष्ट केले. काही गणेश मंडळांनी डीजे वापरणारच, अशी भूमिका घेतली असल्याबाबत विचारले असता, संबंधित मंडळांशी पोलिसांनी चर्चा करून मार्ग काढावा, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, उत्सवांची परंपरा कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषण कमी करण्याची दिशा निश्चित झाली असून, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याची गरज असल्याचे फडणवीस यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे.

## ‘मतदार’डावपेच लढवून भाजप निवडणुका जिंकतो : उद्धव ठाकरे

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई ।| प्रतिनिधी:** पश्चिम बंगाल व तामिळनाडूमध्ये मतदार वगळल्याचे प्रकार घडले. महाराष्ट्रातही त्याचीच प्रचिती दिसून येते. आताच्या ‘एसआयआर’मध्ये दोन कोटी मतदार वगळले गेले ते कुठे वगळले गेले? निवडणुका जिंकण्यासाठी भाजपकडून असे डावपेच वापरले जात आहेत, अशी टीका उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी केली. शिवसेना भवन येथे ३९६ बूथप्रमुखांना विमा पॉलिसी व ओळखपत्राचे वाटप करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.विधानसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. त्यावेळी बोगस मतदार नोंदणीबद्दल आवाज उठविला होता. लोकसभा ते विधानसभा या काळात ४५ लाख जास्त मतदार नोंदले गेले आणि आता एसआयआरमध्ये दोन कोटी कापले.
बीएलए म्हणून जबाबदारी महत्त्वाची आहे. मतदार यादीतील प्रत्येक मतदाराचे नाव, चेहरा परिचित असला पाहिजे, असे ठाकरे म्हणाले.पनवेल, खारघर परिसरात एसआयआरचे अर्ज भरण्यासाठी एका झेरॉक्स केंद्राचा वापर झाला. भाजप कार्यकर्त्यांना बोगस एसआयआर फॉर्म भरण्याचे काम हा नवा रोजगार मिळाला आहे. सत्तेचा वापर जनतेच्या सेवेसाठी व्हावा, पैसा कमावण्यासाठी किंवा भ्रष्टाचारासाठी नव्हे. भाजपसोबतच्या पूर्वीच्या युतीमुळे बीड जिल्ह्यात शिवसेनेने अनेक जागा सोडल्या. त्याचा परिणाम पक्षाच्या संघटनात्मक अस्तित्वावर झाला. आता हे अस्तित्व पुन्हा निर्माण करण्याची संधी असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.गाव तिथे शिवसेना शाखा आणि घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना आहे.

## थरांवरची भरारी! २०१७ पासून महिला गोविंदांची परंपरा!

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई ।| प्रतिनिधी:** डोळ्यांसमोर उंची दिसत नसली, तरी ती गाठण्याची जिद्द मनात असेल तर कोणतेही आव्हान अशक्य नाही. एकमेकींच्या हातात हात देत, आवाजाच्या संकेतांवर विश्वास ठेवत आणि सातत्यपूर्ण सरावातून आत्मविश्वासाची उंची गाठत नयन फाउंडेशनच्या दृष्टिहीन महिला गोविंदा यंदा पुन्हा दहीहंडीच्या मैदानात उतरण्यास सज्ज झाल्या आहेत. यंदा सुमारे २० महिला गोविंदा तब्बल तीन थरांचे आव्हान पेलण्याची तयारी करीत आहेत. दृष्टिहीन मुलांच्या गोविंदा पथकाची सुरुवात २०१४ मध्ये झाली, तर २०१७ पासून महिलांचे पथक दहीहंडी उत्सवात सहभागी होत आहे. आषाढी एकादशीपासून यंदाच्या सरावाला सुरुवात झाली असून, थरांची उंची वाढविण्यासोबतच प्रत्येक गोविंदाच्या मनातील आत्मविश्वासही वाढत आहे. पडण्याची भीती किंवा अडथळ्यांपेक्षा एकमेकींवरचा विश्वास आणि ‘आपण हे करू शकतो’ हा निर्धार त्यांच्या सरावाचा केंद्रबिंदू आहे.
दहीहंडीचा थर रचताना प्रत्येक गोविंदाचा समन्वय, संतुलन आणि विश्वास महत्त्वाचा असतो. दृष्टिहीन गोविंदांसाठी हे आव्हान आणखी वेगळे आहे. मात्र, दृष्टीचा अभाव त्यांच्या जिद्दीसमोर अडथळा ठरत नाही. आवाजाच्या संकेतांवर



एकमेकींशी समन्वय साधत या महिला थरांची रचना करण्याचा सराव करीत आहेत. प्रत्येक प्रयत्नातून त्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ होत आहे. दरम्यान, पुरुष दृष्टिहीन गोविंदा पथकही यंदाच्या दहीहंडीसाठी सज्ज झाले आहे. २०१४ पासून हे पथक दहीहंडीमध्ये सहभागी होत असून, त्यांनी चार थरांचा सराव पूर्ण केला आहे. आता पाचव्या थराचे आव्हान पेलण्यासाठी त्यांची तयारी सुरू आहे. दहीहंडीच्या दिवशी मुंबईतील सुमारे दहा ठिकाणी महिला आणि पुरुष गोविंदा आपली कला सादर करणार आहेत. या गोविंदांसाठी दहीहंडी म्हणजे केवळ हंडी फोडण्याचा किंवा थर रचण्याचा उत्सव नाही. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचा, मर्यादा ओलांडण्याचा आणि समाजासमोर आपल्या सामर्थ्याची नवी ओळख निर्माण करण्याचा हा दिवस आहे. त्यांच्या जिद्दीची ही भरारी समाजातील अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. पहिल्याच वर्षी तीन थरांचे स्वप्न पथकातील २५ वर्षीय रोहिणी भुतेकर यांच्यासाठी यंदाची दहीहंडी विशेष आहे. पूर्णपणे दृष्टिहीन असलेल्या रोहिणी यंदा पहिल्यांदाच गोविंदा पथकाचा भाग झाल्या आहेत. सुरुवातीला मनात असलेली धाकधूक आता सरावामुळे कमी झाली असून, थरावर चढण्याचा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे

**जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज**

## ओबीसींच्या बळावर सरकार; अन्याय झाला तर रस्त्यावर उतरेन : छगन भुजबळ

### आरक्षणाच्या मुद्द्यावरून महायुती सरकारला घरचा आहेर; ओबीसींच्या निधीतील तफावतीवरही सवाल


**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आणण्यात ओबीसी समाजाचाही मोठा वाटा आहे, हे विसरता कामा नये. मात्र, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर स्थानिक पातळीवर निर्णय घेतले जात असतील आणि त्यासाठी शासन निर्णय (जीआर) काढले जात असतील, तर या निर्णयांना अधिकार कोणी दिला, असा सवाल करत ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. ओबीसी समाजावर अन्याय झाला तर मीसुद्धा रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा आरक्षण उपसमितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भुजबळ म्हणाले की, एकीकडे स्थानिक पातळीवर समित्या निर्णय घेत आहेत आणि जीआर काढले जात आहेत. या समितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे-पाटील अशाच पद्धतीने निर्णय घेणार असतील, तर ओबीसी समाजाच्या हितासाठी आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल. निधीतील तफावतीवर संताप ओबीसी समाजाच्या विकासासाठी निधी देण्याच्या मुद्द्यावरही भुजबळ यांनी सरकारला सुनावले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ७५० कोटी रुपये आणि ओबीसी समाजाच्या समितीला केवळ ५ कोटी रुपये, अशी मोठी तफावत कशी चालू शकते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. याच मुद्द्यावरून आपण समन्वय समितीच्या

### रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आणण्यात ओबीसी समाजाचाही मोठा वाटा आहे, हे विसरता कामा नये. मात्र, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर स्थानिक पातळीवर निर्णय घेतले जात असतील आणि त्यासाठी शासन निर्णय (जीआर) काढले जात असतील, तर या निर्णयांना अधिकार कोणी दिला, असा सवाल करत ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. ओबीसी समाजावर अन्याय झाला तर मीसुद्धा रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा आरक्षण उपसमितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भुजबळ म्हणाले की, एकीकडे स्थानिक पातळीवर समित्या निर्णय घेत आहेत आणि जीआर काढले जात आहेत.

बैठकीतून उठून बाहेर आलो, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले. सुविधांमध्येही भेदभावाचा आरोप ओबीसी विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधांच्या प्रश्नावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. एका बाजूला हॉस्टेल तयार झाले आहेत, वातानुकूलित (एसी) हॉस्टेलची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे; मात्र दुसऱ्या बाजूला ओबीसी समाजासाठी अद्याप अपेक्षित सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. हा दुजाभाव अजिबात चालणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भुजबळ यांनी मांडली. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून महायुती सरकारमध्येच मतभेद असल्याचे संकेत देत भुजबळ यांच्या या भूमिकेमुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा ओबीसी विरुद्ध मराठा आरक्षणाचा मुद्दा तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## गोविंदा रे गोपाळा....; ठाण्यात 71 लाखांची हंडी

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई ।| प्रतिनिधी:** आज 5 सप्टेंबर 2026 रोजी राज्यभरात दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला जात आहे. यंदा विविध दहीहंडी मंडळांकडून गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली असून, अनेक ठिकाणी मराठी आणि हिंदी मनोरंजनसृष्टीतील कलाकारांची उपस्थिती हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. ठाण्यातील स्वामी प्रतिष्ठान दहीहंडी महोत्सव यंदा विशेष चर्चेत आहे.
या महोत्सवात तब्बल 71 लाख रुपयांची बक्षिसे वितरित केली जाणार आहेत. गोविंदा पथकांचा मोठा सहभाग आणि ‘सेलिब्रिटी हंडी’ म्हणून मिळालेली ओळख यामुळे या उत्सवाकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.ठाण्यातील टेंभी नाका दहीहंडी देखील मानाची मानली जाते. मुंबई आणि ठाण्यातील गोविंदा पथकांसाठी स्वतंत्र हंड्या ठेवण्यात आल्या असून, विजेत्या पथकांना प्रत्येकी 1 लाख 51 हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. महिलांच्या गोविंदा पथकासाठीही 1 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.शिवसेना आमदार प्रकाश सुर्वे दहीहंडी - मागाठाणे येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा आमदार प्रकाश सुर्वे यांच्याकडून दहीहंडी उत्सव साजरा केला जाणार आहे. मातृभाषा मराठीचा जागर संकल्पना राबत हा दहीहंडी उत्सव साजरा केला जाणार आहे. यामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीचा कार्यक्रम आणिघाकिरण लांडगे यांची 11 लाख 11 हजार 316 )-आयशा खान,द्विंदु शर्मा,अमृता खानविलकर,आफताब शिवदासनी,रॅपर सांबाता,सोनल चव्हाण,हुसेन मन्सुरी,रेहमान खान,पार्थ भालेराव,रितेश देशमुख उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# जल जीवन मिशनच्या कजगाव पाणीपुरवठा योजनेवर प्रश्नचिन्ह; संयुक्त चौकशी होऊनही कारवाई प्रलंबित!

## ८ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**भडगाव, | प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील कजगाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील कथित तांत्रिक त्रुटी, निकृष्ट व अपूर्ण काम तसेच मंजूर काम आणि प्रत्यक्ष कामातील तफावत यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पुंडलिक मधुकर सोनवणे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. तक्रारीनंतर संयुक्त चौकशी होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाहीचे निर्देश दिले असतानाही अद्याप अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप सोनवणे यांनी केला आहे. सोनवणे यांनी दि. ४ मार्च २०२६ रोजी संबंधित प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर दि. २४ जून २०२६ रोजी या प्रकरणाची संयुक्त चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान पाणीपुरवठा योजनेतील पाइपलाइनची कमी-जास्त खोली, पाइपलाइन रस्त्यालगत असल्यामुळे होणारे नुकसान, पंपहाऊसचे अपूर्ण काम तसेच सावदे-गिरणा नदीपात्रातील पाइपलाइन वाहून जाणे, मंजूर तांत्रिक बाबी आणि प्रत्यक्ष कामातील तफावत आदी मुद्द्यांची नोंद झाल्याचे सोनवणे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक येथील मुख्य अभियंत्यांनी दि. १० जुलै २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तक्रारीतील मुद्द्यांच्या अनुषंगाने




स्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती तक्रारदारास देण्याचेही निर्देश देण्यात आले होते. मात्र, तक्रार, संयुक्त चौकशी आणि वरिष्ठ स्तरावरील निर्देशांनंतरही संबंधित ठेकेदार, अभियंते अथवा जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून अंतिम कार्यवाही झाल्याची स्पष्ट माहिती अद्याप मिळालेली नसल्याचे सोनवणे यांचे म्हणणे आहे. यापूर्वी दि. १६ जुलै २०२६ रोजी सोनवणे यांनी प्रशासनाला १५ दिवसांची पूर्वसूचना देत कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, पूर्वसूचनेनंतरही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने आता दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे शांततापूर्ण व कायदेशीर मार्गाने आमरण उपोषण करण्याची अंतिम पूर्वसूचना त्यांनी दिली आहे. "पाठपुरावा वैयक्तिक नसून सार्वजनिक हितासाठी" पुंडलिक मधुकर सोनवणे यांनी सांगितले की, गावातील सार्वजनिक विकासकामांमध्ये पारदर्शकता राहावी, शासनाच्या निधीचा योग्य वापर व्हावा, कामाची गुणवत्ता टिकून राहावी आणि नागरिकांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, यासाठी आपण लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. हा पाठपुरावा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वैयक्तिक स्वरूपाचा नसून सार्वजनिक हित आणि प्रशासनाचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चौकशी अहवालावर अंतिम निर्णयाची मागणी सोनवणे यांनी प्रशासनाकडे संयुक्त चौकशी अहवालाचे परीक्षण करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, मंजूर तांत्रिक मंजुरी आणि प्रत्यक्ष कामाची तुलनात्मक तपासणी करावी, दोषपूर्ण अथवा अपूर्ण काम नियमानुसार पूर्ण करून घ्यावे, शासन निधीचे नुकसान झाले असल्यास नियमानुसार वसुली करावी तसेच संपूर्ण कार्यवाहीचा कारणांसहित लेखी अहवाल तक्रारदारास द्यावा, अशा मागण्या केल्या आहेत. "चौकशी अहवाल तयार होणे ही प्रक्रिया आहे; मात्र त्या अहवालावर निष्पक्ष आणि कारणांसहित अंतिम निर्णय होणे हेच प्रशासनाचे खरे उत्तरदायित्व आहे. त्यामुळे दि. ८ सप्टेंबरपूर्वी प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, अन्यथा शांततापूर्ण मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल," अशी भूमिका पुंडलिक मधुकर सोनवणे यांनी घेतली आहे.

# बावी जिल्हा परिषद शाळेचे तालुक्यात अव्वल यश!

जन सम्राट टाईम्स



**अहिल्यानगर | प्रतिनिधी:** 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानांतर्गत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल जामखेड तालुक्यातील बावी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सदिच्छा भेट देत शाळेचे कौतुक केले. यावेळी जामखेड तालुक्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा. मधुकर (आबा) राळेभात, जामखेड नगरपरिषदेचे सदस्य मोहन पवार, तात्यासाहेब पोकळे, माजी कृषी अधिकारी तथा बावी विकास सेवा सोसायटीचे चेअरमन सुंदरदास बिरंगळ, माजी सरपंच राम पवार, विठ्ठल कारंडे आणि नागेश बिरंगळ आदी मान्यवर उपस्थित होते. आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल अमोल पवार यांचा सत्कार या सदिच्छा भेटीदरम्यान शाळेचे शिक्षक अमोल पवार यांना 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भौतिक सुविधांसह शैक्षणिक वातावरणाचे कौतुक भेट देणाऱ्या लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी शाळेचा सुंदर परिसर, दर्जेदार पायाभूत सुविधा, स्वच्छता तसेच शैक्षणिक वातावरणाची पाहणी केली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेने मिळवलेले हे उल्लेखनीय यश कौतुकास्पद असून इतर शाळांसाठीही ते प्रेरणादायी ठरेल, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या. शाळेने अभियानात मिळवलेल्या यशामागे शिक्षकांचे नियोजन, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच पालक व ग्रामस्थांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# एमआयएमकडून जनतेची दिशाभूल?

## शहर विकास आघाडीचा विरोधी पक्षनेतेपदावर दावा

जन सम्राट टाईम्स



**धुळे| प्रतिनिधी :** धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदावरून पुन्हा एकदा राजकीय संघर्ष पेटला असून एमआयएमकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक तथा शहर विकास आघाडीचे धीरज कलंत्री यांनी केला आहे. न्यायालयाने केवळ चार आठवड्यांच्या कालावधीत विरोधी पक्षनेतेपदाची निवड करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशात एमआयएमच्या नगरसेवकाची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्याबाबत कुठेही नमूद नसल्याचा दावा कलंत्री यांनी केला. शहर विकास आघाडीकडे विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक संख्याबळ अधिक असल्याचे सांगत या पदावर आमचाच दावा असल्याचे कलंत्री यांनी स्पष्ट केले. निवडणुकीपूर्वीच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात आघाडी झाली होती. त्यानुसार विभागीय आयुक्तांकडे गटाची नोंदही करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षनेतेपदावरून रस्सीखेच धुळे महानगरपालिकेची निवडणूक होऊन सुमारे आठ महिने उलटले आहेत. मात्र, विरोधी पक्षनेतेपदाचा प्रश्न अद्याप कायम असून एमआयएम आणि शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसने स्थापन केलेल्या गटामध्ये या पदावरून संघर्ष सुरू आहे. शहर विकास आघाडीच्या माध्यमातून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असल्याचा दावा करण्यात येत असून, संख्याबळाच्या आधारे विरोधी पक्षनेतेपदावर आपला हक्क असल्याचे आघाडीचे म्हणणे आहे. दुसरीकडे एमआयएमकडूनही या पदावर दावा करण्यात येत असल्याने महानगरपालिकेतील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर हालचालींना वेग विरोधी पक्षनेतेपदाबाबत न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनासमोर आता निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आव्हान आहे. न्यायालयाच्या आदेशाचा नेमका अर्थ आणि महापालिकेतील गटांचे संख्याबळ यावरून दोन्ही बाजूंकडून वेगवेगळे दावे केले जात आहेत. त्यामुळे विरोधी पक्षनेतेपदाची निवड कोणाच्या बाजूने जाते, याकडे धुळे महानगरपालिका वर्तुळासह शहरातील राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदावरून पुन्हा एकदा राजकीय संघर्ष पेटला असून एमआयएमकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक तथा शहर विकास आघाडीचे धीरज कलंत्री यांनी केला आहे. न्यायालयाने केवळ चार आठवड्यांच्या कालावधीत विरोधी पक्षनेतेपदाची निवड करण्याचे आदेश दिले आहेत.

# स्वस्त धान्य दुकानदारांच्या प्रश्नांवर ६ सप्टेंबरला पुण्यात महत्त्वपूर्ण बैठक

## मार्जिन मनी, लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ। प्रतिनिधी:** अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या वतीने स्वस्त धान्य दुकानदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता नेमाने फार्म हाऊस, पुणे-सोलापूर रोड, श्रीकृष्ण मंगल कार्यालयासमोर, उरळी कांचन, पुणे येथे ही बैठक होणार आहे. या बैठकीस राज्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार असून जळगाव जिल्ह्यातून सुमारे २०० ते ३०० रास्त भाव दुकानदार व पदाधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. पुणे जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटना, तालुका हवेली यांच्या वतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे प्रमुख मार्गदर्शक काकासाहेब देशमुख राहणार आहेत. तसेच ऑल इंडिया फेअर प्राईज शॉप डीलर फेडरेशन, नवी दिल्लीचे प्रतिनिधी, डी. एन. पाटील, राज्य संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत यादव, जनरल सेक्रेटरी राजेश अंबुसकर, ज्येष्ठ उपाध्यक्ष तसेच राज्य कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. मार्जिन मनीसह विविध प्रश्नांवर चर्चा स्वस्त धान्य दुकानदारांच्या मार्जिन मनीचा प्रश्न तातडीने सोडविणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत राज्य शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे, प्रलंबित शासन निर्णय तातडीने जाहीर करणे, या प्रमुख विषयांवर बैठकीत चर्चा होणार आहे. याशिवाय राज्यभरातील स्वस्त धान्य दुकानदारांना वाहतूक कंत्राटाच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी, ऑल इंडिया फेअर प्राईज शॉप डीलर फेडरेशनच्या केंद्रीय कमिटीच्या बैठकीतील निर्णयांचा आढावा सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबतही बैठकीत विचारविनिमय करण्यात येणार आहे. या बैठकीस पुणे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, तालुकाध्यक्ष तसेच जळगाव जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भुसावळ तालुका अध्यक्ष महेंद्र सपकाळे, जिल्हा सचिव अंभोरे आणि जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कैलास उपाध्याय यांनी केले आहे.

# धरणगाव तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करा!

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची मागणी

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव| प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यात गेल्या महिन्यापासून समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतीपिकांवर गंभीर परिणाम झाला असून तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपनेते गुलाबराव वाघ, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश चौधरी आणि शिवसेनेचे तालुकाप्रमुख जयदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि. ४ सप्टेंबर रोजी धरणगाव तहसील कार्यालयात तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात गेल्या महिन्यापासून पर्जन्यमान नसल्याने शेतपिके करपण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल व उद्विग्न झाला असून परिस्थिती गंभीर बनली आहे. पावसाअभावी गुराढोरांनाही पाण्याची टंचाई भासत असून त्यांच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. चारा छावण्या उभारण्याची मागणी पशुधनासाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. शासनाच्या निकषानुसार २१ दिवसांचा पावसाचा खंड पडल्यास तातडीने उपाययोजना करण्यात येतात. मात्र, धरणगाव तालुक्यात परिस्थिती गंभीर असतानाही अद्याप आवश्यक उपाययोजना झालेल्या नसल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. दहा दिवसांत उपाययोजना न झाल्यास मोर्चा तालुक्यातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकरी व पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. येत्या दहा दिवसांत शासन व प्रशासनाने ठोस कारवाई केली नाही, तर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या वेळी जि.प. माजी उपाध्यक्ष जानकीराम पाटील, माजी सभापती दीपक सोनवणे, नगरसेवक भागवत चौधरी, लक्ष्मण माळी, परमेश्वर महाजन, सुनील चौधरी, किरण अग्निहोत्री, जितेंद्र धनगर, शेतकरी तालुकाप्रमुख विजय पाटील, युवासेना तालुकाप्रमुख स्वप्नील परदेशी, लिलाधर पाटील, नंदू पाटील, अरुण पाटील, गजानन महाजन, सुनील चव्हाण, प्रवीण पाटील, अक्षय मुथा, रियाझ बागवान, वसिम पिंजारी, प्रेमराज चौधरी, मेघनाथ ठाकरे,अरविंद चौधरी, शरद शिरसाठ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** नशिराबाद शिक्षण मंडळ संचलित न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.विकास चौधरी हे उपस्थित होते. तसेच मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष विनायक वाणी, संस्थेचे संचालक जनार्दन माळी आणि ॲड.प्रदीप देशपांडे व मुख्याध्यापक प्रविण महाजन उपस्थित होते. यावेळी शाळेच्या प्रांगणाला गोकुळाचे स्वरूप प्राप्त झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती झाली. रासलीला दरम्यान कृष्ण सुदामा भेटीचे, कालिया मर्दन चे सादरीकरण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी "गोविंदा आला रे आला" व "कृष्ण जन्मला ग बाई कृष्ण जन्मला" या गीतावर नृत्य सादर केले. तसेच गीता व रासलीला दरम्यान श्रीकृष्णाचा जयजयकार करून कृष्णा व कृष्णाच्या सवंगड्यांनी दही



हंडी फोडली व आनंदोत्सव साजरा केला. कृष्णाच्या सर्व सवंगड्यांनी गोकुळातल्या बाळ गोपाळांनी व आमच्या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर, अतिथी गण, पालक रुंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना गोपाळकाल्याचा प्रसाद वाटला. या कार्यक्रमास बाल कृष्णाच्या भूमिकेत नमन बोंडे, विदीप सपकाळे, स्वप्निल बाविस्कर, राधाच्या भूमिकेत फाल्गुनी कोल्हे, यशस्वी मराठे, देवकीच्या भूमिकेत देवांशी सपकाळे, वासुदेवाच्या भूमिकेत कृष्णा वाणी, यशोदेच्या भूमिकेत स्वरा अत्तरदे, कालिया नागाच्या वेशात स्वराज भावसार, सुदामाच्या वेशात रुद्र चौधरी यांनी साकारली. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन वैशाली पाचपांडे, भावना भावसार, सुनिता शिवरामे, मनीषा घोडकर आणि स्वाती चौधरी यांनी केले.

# धुळ्यात मराठा समाजाकडून सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा




जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** मराठा समाजाच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धुळ्यात मराठा समाजाच्या वतीने सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मराठा समाजाने आपला संताप व्यक्त केला. आग्रा रोडवरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यापासून या प्रतिकात्मक अंत्ययात्रेला सुरुवात झाली. दरम्यान, खंडेराव मंदिराजवळ पोलिसांनी ही अंत्ययात्रा रोखली. यावेळी मराठा समाजाच्या काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मागण्या मान्य करण्याची मागणी मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शासनाने मागण्या मान्य करून न्याय दिल्यास सरकारला डोक्यावर घेऊन गुलाल उधळू; मात्र मागण्या मान्य न झाल्यास सरकारच्या प्रतिकात्मक अंत्ययात्रेवरच गुलाल उधळण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. गेल्या सात दिवसांपासून मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. शासनाकडून यापूर्वीही मराठा समाजाला आश्वासने देण्यात आली; मात्र त्यांची पूर्तता झाली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यामुळे समाजामध्ये तीव्र नाराजी असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.


पोलिसांकडून आंदोलन रोखण्याचा प्रयत्न प्रतिकात्मक अंत्ययात्रा मार्गावर पोलिसांनी हस्तक्षेप करत ती खंडेराव मंदिराजवळ रोखली. यावेळी आंदोलनकर्ते आणि पोलिसांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. या आंदोलनात भानुदास बगदे, विनोद जगताप, दीपक रौंदळ, श्रीरंग जाधव, विकास बाबर, ॲड. दिनेश काळे, भैय्या शिंदे, राकेश भोसले, वीरेंद्र मोरे, अण्णा कदम, संतोष लकडे, सुरेश पवार यांच्यासह मराठा समाजातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# खानदेशातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते धनाजी रामचंद्र बिऱ्हाडे..

## मुंबई इलाख्यातून निवडून आलेले महार समाजातील पहिले सरपंच

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी :** खानदेशातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा दलित भारत या प्राक्षिकाचे संपादक धनाजी रामचंद्र बिऱ्हाडे बिऱ्हाडे गुरुजी यांचा जन्म असोदा तालुका जिल्हा जळगाव येथे झाला. सातवीपर्यंतचे शिक्षण आसोदा येथे झाले व अध्यापनाचा कोर्स पीडीसी हायस्कूल धुळे येथून केला. त्यांचे प्राथमिक शिक्षक म्हणून जळगाव जिल्ह्यातील रांजणगाव पिंपळगाव भुसावळ नशिराबाद यावल इत्यादी ठिकाणी नोकरी केली अस्पृश्यतेचे चटके सहन न झाल्यामुळे यावल येथे असताना नोकरीचा राजीनामा दिला व सामाजिक कार्यास सुरुवात केली. सामाजिक जीवनात धनाजी बिऱ्हाडे यांनी विविध पदे भूषवली आहेत सदस्य जळगाव नगरपालिका सदस्य पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड आणि विशेष म्हणजे सरपंच असोदा तालुका जळगाव मुंबई इलाख्यातून निवडून आलेले महार समाजातील पहिले सरपंच... सदस्य संत चोखामेळा बोर्डिंग जळगाव अध्यक्ष पूर्व खानदेश जिल्हा प्राथमिक शाळा कामठी संघ. 1937 पूर्व खानदेश विभाग 1951 जळगाव मतदार संघ पराभूत दोन वेळेस विधानसभा निवडणुकीत



त्यांनी सहभाग घेतला जळगाव खान्देश मधील सामाजिक कार्यातही त्यांचे मोलाचे योगदान आहे. खानदेशातील आंबेडकरी चळवळ सतत जागृत ठेवण्याचे काम बिऱ्हाडे यांनी केल्याचे दिसून येते अनेक तरुणांना कामासाठी प्रशिक्षकांच्या नोकऱ्या लावून दिल्या जळगाव भुसावळ जामनेर सावदा इत्यादी ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहात मुलांना शिकण्याची गोडी लागण्यासाठी डिस्ट्रिक लोकल बोर्ड मार्फत विविध प्रोत्साहन पर योजना राबविण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा बोर्डाच्या शाळांना दरवर्षी सुट्टी देण्याच्या निर्णयात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. सरपंच पदी असताना अस्पृश्यता कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची दखल घेऊन सरकारने असोदा ग्रामपंचायत दीड हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन आदर्श गाव म्हणून शासनातर्फे गौरव करण्यात आला. असोदा गावामध्ये सफाई कामगारांना वेतनावर नेमणुका करण्यास सुरुवात केली समता सैनिक दलाच्या सभा अस्पृश्य कामगार संघटना व दलित फेडरेशनच्या बैठकांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच गायरान जमिनीवर अस्पृश्यांना घरे बांधायची परवानगी मिळाली त्यांची सरपंच पदाची दैदीप्यमान कारकीर्द आजही तेथील लोकांच्या स्मरणात आहे. आंबेडकरी चळवळीचे हे लोन महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात येऊन पोहोचले त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन खानदेशातील हजारो कार्यकर्ते त्यात सहभागी झाले जळगाव जिल्ह्यातील या चळवळीची धुरा बिऱ्हाडे गुरुजी व कर्मवीर सेनू नारायण मेढे यांनी अत्यंत यशस्वीपणे सांभाळली हिंदी इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते अस्पृश्यता निवारणासाठी दलित समाजाला सर्वप्रथम शिक्षणाची महती कळणे आवश्यक असल्याने धनाजी बिऱ्हाडे गुरुजी गावोगावी जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायचे. यांना त्या निमित्ताने खानदेशातील समाजप्रबोधनाचा डंका चौफेर दुमदुमत होता त्याची दखल घेऊन बाबासाहेबांनी आसोदा गावाला भेट दिली .

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# जामनेर-पाचोरा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

## भागपूर उपसा सिंचन योजनेला गती; गोलटेकडी व एकुलती तलावांच्या कामासाठी ८०.०७ कोटींची निविदा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** जामनेर आणि पाचोरा तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. भागपूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत तब्बल १ हजार ३९५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. गोलटेकडी (ता. पाचोरा) लघु पाटबंधारे तलाव आणि एकुलती (ता. जामनेर) साठवण तलावाच्या बांधकामासाठी ८० कोटी ७ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली असून, काम सुरू करण्यासाठी कार्यारंभ आदेशही देण्यात आले आहेत. भागपूर उपसा सिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यात तापी नदीतून पावसाळ्यात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी पंपांच्या माध्यमातून उचलून भागपूर धरणात साठविण्याचे नियोजन आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात भागपूर प्रकल्पातील पाणी उचलून गोलटेकडी लघु पाटबंधारे तलाव तसेच एकुलती साठवण तलावात सोडण्यात येणार आहे. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांमध्ये वर्षभर पाणीसाठा उपलब्ध राहण्यास मदत होणार आहे. गोलटेकडीमुळे १,००३ हेक्टरला लाभ गोलटेकडी लघु पाटबंधारे प्रकल्पाची साठवण क्षमता ६.०० दशलक्ष घनमीटर आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून तब्बल १ हजार ३ हेक्टर शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. एकुलती तलावातून ३९२ हेक्टर सिंचनाखाली एकुलती साठवण तलावाची साठवण क्षमता १.७५६ दशलक्ष घनमीटर असून, या प्रकल्पातून ३९२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. अशा प्रकारे गोलटेकडी आणि एकुलती या दोन्ही प्रकल्पांमुळे एकूण १,३९५ हेक्टर शेतीला शाश्वत सिंचनाचा आधार



मिळणार आहे. दुष्काळी भागाला मिळणार शाश्वत पाण्याचा आधार जामनेर आणि पाचोरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये सिंचनाच्या मर्यादित सुविधांमुळे शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे सातत्याने निर्माण होणारी पाणीटंचाई आणि अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. गोलटेकडी आणि एकुलती तलावांची मागणी शेतकऱ्यांकडून दीर्घकाळापासून करण्यात येत होती. आता या प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. १,३९५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आल्याने शेतीचे उत्पादन वाढण्याबरोबरच शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार मिळण्याची अपेक्षा आहे.जामनेर आणि पाचोरा तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. भागपूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत तब्बल १ हजार ३९५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. गोलटेकडी (ता. पाचोरा) लघु पाटबंधारे तलाव आणि एकुलती (ता.जामनेर) साठवण तलावाच्या बांधकामासाठी ८० कोटी ७ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली असून, काम सुरू करण्यासाठी कार्यारंभ आदेशही देण्यात आले आहेत. भागपूर उपसा सिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यात तापी नदीतून पावसाळ्यात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी पंपांच्या माध्यमातून उचलून भागपूर धरणात साठविण्याचे नियोजन आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात भागपूर प्रकल्पातील पाणी उचलून गोलटेकडी लघु पाटबंधारे तलाव तसेच एकुलती साठवण तलावात सोडण्यात येणार आहे. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांमध्ये वर्षभर पाणीसाठा उपलब्ध राहण्यास मदत होणार आहे. गोलटेकडीमुळे १,००३ हेक्टरला लाभ गोलटेकडी लघु पाटबंधारे प्रकल्पाची साठवण क्षमता ६.०० दशलक्ष घनमीटर आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून तब्बल १ हजार ३ हेक्टर शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. एकुलती तलावातून ३९२ हेक्टर सिंचनाखाली एकुलती साठवण तलावाची साठवण क्षमता १.७५६ दशलक्ष घनमीटर असून, या प्रकल्पातून ३९२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. अशा प्रकारे गोलटेकडी आणि एकुलती या दोन्ही प्रकल्पांमुळे एकूण १,३९५ हेक्टर शेतीला शाश्वत सिंचनाचा आधार मिळणार आहे. दुष्काळी भागाला मिळणार शाश्वत पाण्याचा आधार जामनेर आणि पाचोरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये सिंचनाच्या मर्यादित सुविधांमुळे शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे सातत्याने निर्माण होणारी पाणीटंचाई आणि अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. गोलटेकडी आणि एकुलती तलावांची मागणी शेतकऱ्यांकडून दीर्घकाळापासून करण्यात येत होती. आता या प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. १,३९५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आल्याने शेतीचे उत्पादन वाढण्याबरोबरच शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## भरधाव कंटेनर पुलाचे कठडे तोडून थेट खाली कोसळला!



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळ्यात वडजाई रोड परिसरात भरधाव कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पुलाचे कठडे तोडून थेट खाली रस्त्यावर कोसळल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. या अपघातात कंटेनरची धडक एका दुचाकीस्वाराला बसल्याने तो गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातून बंगळुरूकडे कंपनीच्या नवीन कार घेऊन जाणारा कंटेनर वडजाई रोड परिसरातून जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कंटेनरने पुलाचे कठडे तोडत थेट खाली असलेल्या रस्त्यावर कोसळला. यावेळी कंटेनरची धडक दुचाकीस्वाराला बसली. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली शुक्रवार असल्याने वडजाई रोड परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने नमाज पठणासाठी गेले होते. त्यामुळे या परिसरात नेहमीच्या तुलनेत गर्दी कमी होती. परिणामी मोठी जीवितहानी टळल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. स्थानिक नागरिकांसह पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमी दुचाकीस्वाराला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. चालक मद्यधुंद असल्याचा प्रत्यक्षदर्शींचा आरोप दरम्यान, कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचा आरोप काही प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. मात्र, चालकाने मद्यप्राशन केले होते की नाही, हे वैद्यकीय तपासणी व पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. या अपघाताचा अधिक तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू असून वाहनावरील नियंत्रण नेमके कोणत्या कारणामुळे सुटले, याचा तपास केला जात आहे.धुळ्यात वडजाई रोड परिसरात भरधाव कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पुलाचे कठडे तोडून थेट खाली रस्त्यावर कोसळल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. या अपघातात कंटेनरची धडक एका दुचाकीस्वाराला बसल्याने तो गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातून बंगळुरूकडे कंपनीच्या नवीन कार घेऊन जाणारा कंटेनर वडजाई रोड परिसरातून जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कंटेनरने पुलाचे कठडे तोडत थेट खाली असलेल्या रस्त्यावर कोसळला. यावेळी कंटेनरची धडक दुचाकीस्वाराला बसली. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली शुक्रवार असल्याने वडजाई रोड परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने नमाज पठणासाठी गेले होते. त्यामुळे या परिसरात नेहमीच्या तुलनेत गर्दी कमी होती.

## एमआयएमचा विरोधी पक्षनेता होणार? न्यायालयाचा मनपाला निर्णय घेण्याचा आदेश

### गुणवत्तेच्या आधारे विरोधी पक्षनेत्याची निवड करण्याचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा आता न्यायालयाच्या आदेशामुळे निर्णायक वळणावर आला आहे. छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने मनपा प्रशासनाला गुणवत्तेच्या आधारे विरोधी पक्षनेतेपदाची निवड चार आठवड्यांच्या आत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे धुळे मनपात एमआयएमला विरोधी पक्षनेतेपद मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. धुळे महानगरपालिकेची निवडणूक होऊन तब्बल आठ महिन्यांचा कालावधी उलटला, तरी विरोधी पक्षनेत्याची निवड झालेली नव्हती.

याविरोधात एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत विरोधी पक्षनेतेपदासाठी न्यायालयीन दाद मागितली होती. अखेर न्यायालयाने मनपा प्रशासनाला चार आठवड्यांत गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याने एमआयएमच्या भूमिकेला बळ मिळाले आहे. जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या



धुळे महानगरपालिका निवडणुकीत भाजपने एकतर्फी विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा सत्तास्थापना केली. या निवडणुकीत एमआयएमनेही १० जागा जिंकत मनपातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवले. त्यामुळे एमआयएमने महापौरांकडे विरोधी पक्षनेतेपदाची मागणी करणारे पत्र दिले होते. मात्र निवडणुकीनंतर अनेक महिने उलटूनही विरोधी पक्षनेत्याची निवड न झाल्याने एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला.

गुणवत्तेच्या आधारे विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घेण्याची मागणी पक्षाकडून करण्यात आली होती. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानंतर आता मनपा प्रशासन आणि महापौर याबाबत काय निर्णय घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कायदेशीर बाबींचा विचार करून एमआयएमच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या दाव्यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी एमआयएमचे इर्शाद जहागीरदार यांनी पत्रकार परिषदेत केली. न्यायालयाच्या आदेशामुळे एमआयएमच्या दाव्याला मोठे बळ मिळाले असले, तरी अंतिम निर्णय मनपा प्रशासनाने गुणवत्तेच्या आधारे घ्यायचा आहे. त्यामुळे आगामी चार आठवडे धुळे महानगरपालिकेच्या राजकारणासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा आता न्यायालयाच्या आदेशामुळे निर्णायक वळणावर आला आहे. छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने मनपा प्रशासनाला गुणवत्तेच्या आधारे विरोधी पक्षनेतेपदाची निवड चार आठवड्यांच्या आत करण्याचे निर्देश दिले आहेत.

## शहाद्यात महिलांसाठी अमृत ब्युटी पार्लर प्रशिक्षणाला सुरुवात

### स्वयंरोजगाराच्या दिशेने महिलांना मोठी संधी

जन सम्राट टाईम्स

**शहादा । (प्रतिनिधी):** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शहर व तालुक्यातील महिलांना स्वतःचा व्यवसाय उभारून स्वावलंबी होण्यासाठी अमृत संस्थेच्या माध्यमातून ब्युटी पार्लर प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली. या प्रशिक्षणाचा शुभारंभ विभागीय व्यवस्थापक मंगेश खाडिलकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा व्यवस्थापक योगेश अहिरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मंगेश खाडिलकर यांनी अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपस्थित प्रशिक्षणार्थींना दिली. तसेच ब्युटी पार्लर व्यवसाय सुरू करताना आवश्यक असणाऱ्या बाबी, व्यवसाय नियोजन आणि स्वयंरोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचा लाभ शहादा तालुक्यातील १५ महिला घेणार असून, प्रशिक्षणाच्या माध्यमातून



महिलांना कौशल्याधारित रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. महिलांनी प्रशिक्षणाचा योग्य उपयोग करून स्वतःचा व्यवसाय उभारावा आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. कार्यक्रमाला जिल्हा उपव्यवस्थापक कार्तिक तोमर, कविता गिरासे, तसेच राजपूत समाजाच्या प्रमुख दीपाली ताई राजपूत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महिलांना रोजगाराच्या पारंपरिक संधींसोबतच कौशल्याधारित व्यवसायाकडे वळविण्यासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांचे महत्त्व वाढले आहे. शहाद्यात सुरू झालेल्या या प्रशिक्षणामुळे सहभागी महिलांना स्वतःचा ब्युटी पार्लर व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्य मिळण्यास मदत होणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शहर व तालुक्यातील महिलांना स्वतःचा व्यवसाय उभारून स्वावलंबी होण्यासाठी अमृत संस्थेच्या माध्यमातून ब्युटी पार्लर प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली. या प्रशिक्षणाचा शुभारंभ विभागीय व्यवस्थापक मंगेश खाडिलकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा व्यवस्थापक योगेश अहिरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मंगेश खाडिलकर यांनी अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपस्थित प्रशिक्षणार्थींना दिली.

## बोदवड जि. प. उर्दू मुलींच्या शाळेत पहिली सर्वसाधारण सभा संपन्न

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । प्रतिनिधी:** येथील जिल्हा परिषद उर्दू मुलींच्या शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची पहिली सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत शाळेच्या सर्वांगीण विकासासह विद्यार्थिनींच्या शैक्षणिक हितासाठी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर आवश्यक त्या ठरावांना मंजुरी देण्यात आली. सभेतील प्रमुख निर्णय म्हणजे परिसरातील परिचित शिक्षणप्रेमी कलीम शेख यांची शाळा व्यवस्थापन समितीवर 'स्वीकृत सदस्य' म्हणून एकमताने निवड करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्राविषयी असलेली त्यांची आस्था तसेच सामाजिक व शैक्षणिक कार्यातील योगदान लक्षात घेऊन त्यांच्या नावाला सभेतील उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी एकमताने पसंती दिली. शाळेच्या विकासावर सकारात्मक चर्चा



पहिल्या सर्वसाधारण सभेत शाळेच्या भौतिक सुविधा अधिक सक्षम करणे, विद्यार्थिनींना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्याबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवरही विचारविनिमय करण्यात आला. शाळेच्या विकासासाठी पालक, शिक्षक, समिती सदस्य आणि समाजातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी एकत्रितपणे योगदान देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. कलीम शेख यांचे अभिनंदन शाळा व्यवस्थापन समितीच्या स्वीकृत सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कलीम शेख यांचे शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि उपस्थित सर्व सदस्यांनी अभिनंदन केले. यावेळी नगरसेवक जफर शेख तसेच जननायक फाउंडेशनचे मोहसीन सर यांनीही कलीम शेख यांना शुभेच्छा दिल्या. कलीम शेख यांच्या अनुभवाचा आणि शिक्षण क्षेत्राविषयीच्या आस्थेचा शाळेच्या विकासासाठी निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस यावेळी मान्यवरांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## फर्दापूर व जगला तांडा शिवाराची आमदार अब्दुल सत्तार यांनी केली पाहणी

### कमी पावसामुळे कापूस, मका व सोयाबीनचे मोठे नुकसान; पंचनामे करून भरपाई देण्याचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर तांडा आणि जगला तांडा परिसरात कमी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कापूस, मका आणि सोयाबीन या प्रमुख पिकांना फटका बसल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी दोन्ही शिवारांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांकडून पिकांचे नुकसान, पावसाची स्थिती आणि निर्माण झालेल्या अडचणींची माहिती जाणून घेतली. सिल्लोड-



सोयगाव तालुक्यातील शेती पिकांच्या परिस्थितीचा आढावाही यावेळी घेण्यात आला. पाहणीदरम्यान कृषी विभागाचे अधिकारी, कृषी सेवक, तलाठी तसेच महसूल विभागाचे पथक उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांकडूनही आमदारांनी पीक परिस्थितीची माहिती घेतली. तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश कमी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी आमदारांकडे केली. शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी, अशी भूमिका आमदारांनी यावेळी व्यक्त केली. कमी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा असून, आता प्रशासनाकडून पंचनामे आणि पुढील कार्यवाही किती वेगाने केली जाते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.सोयगाव तालुक्यातील फर्दापूर तांडा आणि जगला तांडा परिसरात कमी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कापूस, मका आणि सोयाबीन या प्रमुख पिकांना फटका बसल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी दोन्ही शिवारांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांकडून पिकांचे नुकसान, पावसाची स्थिती आणि निर्माण झालेल्या अडचणींची माहिती जाणून घेतशेती पिकांच्या परिस्थितीचा आढावाही यावेळी घेण्यात आला. पाहणीदरम्यान कृषी विभागाचे अधिकारी, कृषी सेवक, तलाठी तसेच महसूल विभागाचे पथक उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांकडूनही आमदारांनी पीक परिस्थितीची माहिती घेतली. तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश कमी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी आमदारांकडे केली.

## विद्यार्थिनींना घेऊन जाणाऱ्या बसला भीषण अपघात!

जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी :** साक्री तालुक्यातील म्हसदी गावाजवळ विद्यार्थिनींना घेऊन जाणाऱ्या मानव विकास मिशनच्या बसला भीषण अपघात झाला. बस आणि ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने बसमधील १७ विद्यार्थिनी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी विद्यार्थिनींना उपचारासाठी साक्री येथील रुग्णालयात दाखल केले. मिळालेल्या माहितीनुसार, शालेय विद्यार्थिनींना म्हसदी गावात घेऊन येणारी मानव विकास मिशनची बस क्रमांक MH 06 S 8589 आणि ट्रक क्रमांक MH 18 AA 5888 यांच्यात म्हसदी गावाजवळील बंगाली बाबा मंदिर परिसरात समोरासमोर धडक झाली.या अपघातात उभंड, नांद्रे तसेच परिसरातील विविध गावांतील विद्यार्थिनींचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे. धडक इतकी जोरदार होती की बसचे मोठे नुकसान झाले. नागरिकांकडून तातडीने मदतकार्य अपघाताची माहिती मिळताच म्हसदी गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

जखमी विद्यार्थिनींना बसमधून बाहेर काढून तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघाताचे कारण तपासाअंती स्पष्ट होणार दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप निश्चित माहिती समोर आलेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून अपघाताचा अधिक तपास सुरू आहे. जखमी विद्यार्थिनींची प्रकृती आणि अपघाताचे नेमके कारण याबाबत अधिक माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स



# जळगावच्या राजकारणात भूकंप, भुसावळच्या राजकारणात खळबळ!

## पवारांच्या राष्ट्रवादीच्या माजी नगराध्यक्षांसह 11 नगरसेवकांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** भुसावळ नगरपालिकेमध्ये लोकनियुक्त नगराध्यक्षा म्हणून गायत्री भंगाळे निवडून आल्यानंतर त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणी त्यांना अपात्र ठरविण्यात आले. त्यानंतर भाजपच्या शैलजा नारखेडे या प्रभारी नगराध्यक्षा म्हणून काम पाहत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना कुठेच न्याय मिळत नसल्याच्या भावनेतून पक्षाच्या तब्बल 12 नगरसेवकांपैकी 11 नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृतवातील शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे भुसावळच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. भुसावळचे माजी प्रभारी नगराध्यक्ष तथा प्रहारचे जनशक्ती पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल चौधरी यांनी बुधवारी 2 सप्टेंबर रोजी मुंबईत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर दुसर्‍याच दिवशी अर्थात गुरुवारी रात्री 10 वाजता भुसावळातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातून निवडून आलेल्या 11 नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ‘धनुष्यबाण’ हाती घेतला. एकाच वेळी राष्ट्रवादीच्या पदाधिकार्‍यांनी धक्कातंत्राचा वापर करीत शिंदेंच्या शिवसेनेत केलेल्या प्रवेशाने भुसावळातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. माजी नगराध्यक्षांचाही शिवसेनेत प्रवेश माजी नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांनीदेखील शिवसेनेत प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे भुसावळसह जळगाव जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान, भुसावळातील माजी आमदार संतोष चौधरींच्या नेतृत्वात राष्ट्रवादीच्या तिकीटावर निवडून आलेले गटनेता सचिन संतोष चौधरींसह 11 नगरसेवकांनी गुरुवारी



रात्री मुंबईत उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादीच्या 11 नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसाठी ही बाब धक्कादायक मानली जात आहे. चौधरींच्या नेतृत्वात निवडून आलेले 11 नगरसेवक ‘शिवसेनेत’ भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी यांच्या नेतृत्वात निवडून आलेल्या 12 पैकी 11 नगरसेवकांनी गुरुवारी रात्री शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश करणार्‍यांमध्ये गटनेता आणि नगरसेवक सचिन संतोष चौधरी (प्रभाग 19 ब), शेख दिलनबाज इक्बाल (प्रभाग क्र. 12 अ), उल्हास भीमराव पगारे (प्रभाग 2 अ), सुभद्रा गणपत गुंजाळ (प्रभाग 14 ब), अमीन निसार कुरेशी (15 अ), शेख नसीब बी. शेख नदीम (प्रभाग 15 ब), सचिन भास्कर पटेल (16 अ), अकिल नादर पिंजारी (प्रभाग 17 अ), शबाना बी.सिकंदर खान (प्रभाग 17 ब), पुष्पा कैलास चौधरी (प्रभाग 19 अ), सुनीता कृष्णा कर (प्रभाग 13 ब) यांचा समावेश आहे. नगरसेवक पद वाचवण्यासाठी गायत्री भंगाळे शिवसेनेत? भुसावळमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. भुसावळ नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद वाचवण्यासाठी गायत्री भंगाळे यांचा शिवसेनेत प्रवेश असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी आणि माजी नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांनी शिंदे गटात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. 2025 मध्ये झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे यांचा पराभव करत गायत्री भंगाळे नगराध्यक्षपदी विजयी झाल्या होत्या. मात्र गायत्री भंगाळे यांचे जात प्रमाणपत्र समितीने अवैध ठरवल्याने त्यांचं नगराध्यक्ष पद अपात्र ठरवण्यात आलं होतं. भुसावळ नगरपालिकेमध्ये लोकनियुक्त नगराध्यक्षा म्हणून गायत्री भंगाळे निवडून आल्यानंतर त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणी त्यांना अपात्र ठरविण्यात आले. त्यानंतर भाजपच्या शैलजा नारखेडे या प्रभारी नगराध्यक्षा म्हणून काम पाहत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना कुठेच न्याय मिळत नसल्याच्या भावनेतून पक्षाच्या तब्बल 12 नगरसेवकांपैकी 11 नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृतवातील शिवसेनेत प्रवेश केला आहे. तथा प्रहारचे जनशक्ती पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल चौधरी यांनी बुधवारी 2 सप्टेंबर रोजी मुंबईत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर दुसर्‍याच दिवशी अर्थात गुरुवारी रात्री 10 वाजता भुसावळातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातून निवडून आलेल्या 11 नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ‘धनुष्यबाण’ हाती घेतला.


# विदर्भातील अतिवृष्टीचा धोका कमी; कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकला

जन सम्राट टाईम्स

**नागपूर :** विदर्भात गेल्या काही दिवसांपासून पावसाला कारणीभूत ठरलेल्या हवामान प्रणालीने आता दिशा बदलली असून, उत्तर-पूर्व मध्य प्रदेशातील कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकू लागला आहे. त्यामुळे विदर्भावरील त्याचा प्रभाव काही प्रमाणात कमी झाला असून, अतिमुसळधार पावसाचा धोका तुलनेने कमी झाला आहे. हवामान विभागाने यापूर्वी गोंदिया आणि अमरावती जिल्ह्यांसाठी जारी केलेला ऑरेंज अलर्ट आता यलो अलर्टमध्ये बदलला आहे. त्याचबरोबर भंडारा आणि नागपूर जिल्ह्यांनाही यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील २४ तासांत या भागातील काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमी दाबाच्या पट्ट्याची दिशा बदलली २ सप्टेंबर रोजी हवामान विभागाने गोंदिया आणि अमरावतीसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला होता. कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे विदर्भातील काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे प्रशासनासह नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतर हवामान प्रणालीच्या स्थितीत बदल झाला. उत्तर-पूर्व मध्य प्रदेशातील कमी दाबाचा पट्टा अपेक्षित स्थितीत न राहता उत्तरेकडे सरकू लागल्याने विदर्भावर त्याचा प्रभाव कमी झाला आहे. परिणामी, पावसाची तीव्रता कमी होण्यास सुरुवात झाली आहे.कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकल्यामुळे विदर्भात अतिमुसळधार पावसाची शक्यता कमी झाली असली, तरी पावसाचा धोका पूर्णपणे टळलेला नाही. गोंदिया, अमरावती, भंडारा आणि नागपूर या चार जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये पुढील २४ तासांत काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अलर्टची तीव्रता कमी झाली असली तरी नागरिकांनी स्थानिक हवामानाच्या सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# जळगावात चोरीच्या दुचाकीसह दोघे पोलिसांच्या जाळ्यात!



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** चोरीची बजाज पल्सर मोटारसायकल विक्री करण्याच्या उद्देशाने जळगाव शहरात फिरणाऱ्या दोघांना जिल्हापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. संशयितांकडून विनाक्रमांकाची बजाज पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली. पोलिसांनी वाहनाचा चेसीस व इंजिन क्रमांक तपासून आरटीओ ॲपच्या माध्यमातून माहिती घेतली असता, सदर मोटारसायकल चोरीची असल्याचे स्पष्ट झाले. ही दुचाकी शनीपेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास पोलीस अंमलदार किरण पंढरीनाथ वानवडे आणि प्रविण राजेंद्र जाधव हे जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. यावेळी कांताई नाट्यगृह परिसरात दोन इसम चोरीची मोटारसायकल विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तत्काळ कांताई नाट्यगृह परिसर गाठला. तेथे दोन इसम विनाक्रमांकाची बजाज पल्सर मोटारसायकल घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आले.

पोलिसांनी त्यांना थांबवून मोटारसायकलची कागदपत्रे तसेच मालकी हक्काबाबत विचारणा केली. मात्र, दोघांनाही समाधानकारक माहिती देता आली नाही. चौकशी केली असता त्यांनी आपली नावे मनोज दत्तू चौधरी (वय २४, रा. ज्ञानदेव नगर परिसर, जुना खेडी रोड, जमुना नगर, जळगाव) आणि सुमित शंकर चौधरी (वय ३१, रा. श्रीराम चौक, हरिओम नगर, जळगाव) अशी सांगितली. यानंतर पोलिसांनी संशयितांकडील दुचाकीचा चेसीस क्रमांक व इंजिन क्रमांक तपासला. आरटीओ ॲपवरून वाहनाची माहिती घेतल्यानंतर या मोटारसायकलचा मूळ नोंदणी क्रमांक MH-19-DY-7458 असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी वाहनाच्या मालकाशी संपर्क साधून अधिक माहिती घेतली. चौकशीदरम्यान सदर बजाज पल्सर चोरीस गेल्याचे तसेच याप्रकरणी शनीपेठ पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी चोरीची दुचाकी जप्त करून दोन्ही संशयितांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी शनीपेठ पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे. या कारवाईमुळे चोरीची वाहने विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हापेठ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल वाघ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# शिवरायांवर फिदा होती औरंगजेबाची मोठी मुलगी झेबुन्निसा?

* छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्वधर्म सन्मान, स्त्री प्रति आदर या गुणांसह नीडरता, शौर्य आणि मातृभूमीप्रती असीम निष्ठेने मोहित! > (आग्र्यात कळलेला हा इतिहासाचा नवा पैलू आहे, ज्याची पुष्टी तात्काळ आग्र्यात होऊ शकली नाही. मात्र, तिथे या दंतकथा अनेक पिढ्या असल्याचे स्थानिक बुजुर्ग कौम आणि मुस्लीम गाईडसुद्धा सांगतात.)

### झेबुन्निसा (Zeb-un-Nisa) आणि शिवरायांच्या सुटकेची दंतकथा

* आग्र्यातील अनेक स्थानिक कथा आणि काल्पनिक साहित्यांमध्ये असा दावा केला जातो की, औरंगजेबाची मोठी मुलगी झेबुन्निसा ही शिवाजी महाराजांच्या शौर्यावर आणि निर्भयतेवर मोहित झाली होती आणि तिने त्यांना आग्र्याहून निसटण्यास मदत केली. अर्थात हा निव्वळ काल्पनिक आणि रम्य कथांचा भाग आहे, असा काही मुघल इतिहास अभ्यासकांचा दावा आहे. समकालीन किंवा अधिकृत ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये (उदा. जयपूरची पत्रे, मुघल दफ्तर) झेबुन्निसाचा शिवाजी महाराजांच्या सुटकेशी काडीमात्र संबंध असल्याचा उल्लेख नाही, असा दावा काही मुघल इतिहास अभ्यासक करतात.

### औरंगजेबाने झेबुन्निसाला दिलेली शिक्षा

* मुघल इतिहास संशोधकांना दाव्यानुसार, औरंगजेबाने आपली कन्या झेबुन्निसा हिला दिल्लीच्या सलीमगड किल्ल्यात 20 वर्षे नजरकैदेत ठेवले होते. मात्र, या शिक्षेचे खरे कारण शिवरायांना आग्र्याहून सुटकेत मदत करणे हे नव्हते. या अभ्यासकांच्या मते, इ.स. 1681 मध्ये औरंगजेबाचा मुलगा शहजादा मुहम्मद अकबर याने पित्याविरुद्ध बंड केले होते. झेबुन्निसाने त्या बंडात आपला भाऊ अकबर याला गुप्त पत्रे पाठवून पाठिंबा दिला होता. हा कट उघडकीस आल्यामुळे औरंगजेबाने संतापून तिला जन्मठेपेसारखी कैद दिली. याचा शिवाजी महाराजांच्या आग्र्यातील सुटकेशी कोणताही संबंध नव्हता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून चतुराईने सुटकेची घटना 1666 मध्ये घडली होती.

### झीनत-उन-निसा आणि संभाजी महाराजांचे कुटुंबीय

* औरंगजेबाची दुसरी कन्या



झीनत-उन-निसा हिने पुढे जाऊन मराठा राजघराण्याला मदत केली होती, परंतु ती आग्र्यामध्ये नव्हती; इ.स. 1689 मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर जेव्हा राणी येसूबाई आणि बाल शाहू महाराज (संभाजी महाराजांचे पुत्र) मुघलांच्या कैदेत गेले, तेव्हा झीनत-उन-निसाने बाल शाहू महाराजांना स्वतःच्या मुलाप्रमाणे

विक्रांत पाटील
Vikrant@Journalist.Com

ममतेने वागवले, त्यांची काळजी घेतली आणि मुघल छावणीत त्यांना सन्मानाची वागणूक मिळावी म्हणून प्रयत्न केले. संभवतः या प्रसंगाची गल्लत संभाजी महाराजांच्या बालपणाशी केली जाते, असे मुघल इतिहास अभ्यासकांचे मत आहे.

### शिवरायांच्या आग्रा सुटकेतील काही तथ्य

* इतिहास संशोधक आणि खुद्द भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याने म्हणजेच एएसआयने देखील मान्य केले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज हे आग्रा किल्ल्याच्या आत कैदी नसून, किल्ल्याबाहेरील जयपूरच्या राजांच्या हवेलीतच नजरकैदेत होते आणि तिथूनच त्यांनी ही अभूतपूर्व सुटका करून घेतली. आग्रा किल्ल्यात महाराजांनी दाखविलेल्या स्वाभिमानी बाण्यानंतर अपमानित औरंगजेबाने त्यांना आग्रा किल्ल्याबाहेर, मिर्झाराजा जयसिंग यांचे सुपुत्र कुंवर रामसिंग यांच्या हवेलीत नजरकैदेत ठेवले. त्याला 'जयपूर हाऊस' किंवा राजा जयसिंग/मानसिंग यांची हवेली म्हणूनही ओळखले जाई. ही हवेली किल्ल्यापासून काही अंतरावर यमुना नदीकाठाजवळ होती. आग्रा किल्ल्याची तटबंदी इतकी अभेद्य होती की, तेथून कोणाचीही सुटका होणे केवळ अशक्य होते. शिवरायांना जर त्या किल्ल्यात डांबले असते, तर तिथून निसटणे अत्यंत कठीण ठरले असते. या घटनेने मुघल साम्राज्याची अब्रू संपूर्ण भारतात धुळीस मिळवली आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याची आणि बुद्धीचातुर्याची कीर्ती जगभर पसरली. इथे हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर यांनी आग्र्याच्या कैदेत दाखवलेले साहस हा जगातल्या इतिहासातील स्वामीनिष्ठेचा आणि बलिदानाचा सर्वात मोठा आणि अद्वितीय नमुना आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना हवेलीतून सुखरूप बाहेर काढण्यासाठी या दोन मावळ्यांनी थेट स्वतःच्या मृत्यूच्या दाढेत उडी घेतली होती. (VP)

# भीमा-कोरेगाव, परभणी आंदोलनातील गुन्हे तातडीने रद्द करा!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** भीमा-कोरेगाव आणि परभणी येथील घटनांनंतर झालेल्या आंदोलनांमध्ये आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने रद्द करावेत, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने केली आहे. यासंदर्भात संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दीपक केदार यांनी आज महाराष्ट्र विधानभवन, मुंबई येथे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन



साद केले. दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनातील दाखल गुन्हे मागे घेण्यात आलेल्या धर्तीवर भीमा-कोरेगाव व परभणी आंदोलनातील आंदोलकांवरील गुन्ह्यांचाही तातडीने पुनर्विचार करून ते रद्द करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी राज्यातील वाढते दलित अन्याय-अत्याचार, सामाजिक न्यायाचे प्रश्न, आरक्षणाचे संरक्षण आणि विविध सामाजिक प्रश्नांसाठी झालेल्या आंदोलनांवरील गुन्हे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आंदोलकांवर दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे अनेकांना कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याने शासनाने या प्रकरणांकडे संवेदनशीलतेने पाहावे, अशी भूमिका ऑल इंडिया पँथर सेनेने मांडली. या मागणीची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिल्याचे संघटनेने सांगितले.

# नशिराबाद येथील सराईत गुन्हेगार 'शोएब बिल्डर'याच्यावर एमपीडीए कारवाई!



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** नशिराबाद परिसरात दहशत निर्माण करणारा सराईत गुन्हेगार शोएब शेख गुलाम नबी उर्फ ‘शोएब बिल्डर’ (वय ३५, रा. ख्वाजा नगर, नशिराबाद) याच्याविरुद्ध पोलिसांनी एम.पी.डी.ए. (MPDA) कायद्यान्वये कठोर कारवाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले असून, त्याची रवानगी मध्यवर्ती कारागृह, येरवडा (पुणे) येथे करण्यात आली आहे.

शोएब बिल्डर याच्याविरुद्ध नशिराबाद पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, चोरी, बेकायदेशीररीत्या गर्दी जमवून मारहाण करणे तसेच तडीपारी आदेशाचे उल्लंघन यांसारखे एकूण ७ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्या कथित गुन्हेगारी कारवाया आणि परिसरातील वाढत्या दहशतीच्या पार्श्वभूमीवर नशिराबाद पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता एम. नारखेडे यांनी त्याच्याविरुद्ध MPDA कारवाईचा प्रस्ताव तयार केला. श्रीकांत धिवरे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला होता. प्रस्तावाची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानबद्धतेचा आदेश दिल्यानंतर पोलिसांनी शोएब बिल्डरला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची येरवडा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि भुसावळ उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईमध्ये नशिराबाद पोलीस ठाण्याच्या स.पो.नि. योगिता एम. नारखेडे, पोउपनि प्रिया दातीर, पो.हे.कॉ. गुणवंत देशमुख, पो.हे. कॉ. प्रशांत विरणारे, पो.कॉ. भरत बाविस्कर, पो.कॉ. पंकज सोनवणे, पो.कॉ. प्रविण लोहार तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे स.फौ. सुनिल दामोदरे यांच्या पथकाने सहभाग घेतला. सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू ठेवत पोलिसांनी नशिराबाद परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ही कारवाई केल्याचे सांगण्यात आले. नशिराबाद परिसरात दहशत निर्माण करणारा सराईत गुन्हेगार शोएब शेख गुलाम नबी उर्फ ‘शोएब बिल्डर’ याच्याविरुद्ध पोलिसांनी एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कठोर कारवाई केली आहे.

# वीर जवान रोहित पाटील यांना हजारोंचा साश्रुनयनांनी निरोप

## तिरंग्यासह निघाली अंत्ययात्रा; ‘भारत माता की जय’, ‘रोहित काटे अमर रहे’च्या घोषणांनी दुमदुमले कोळपिंप्री

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** देशसेवेचे कर्तव्य बजावत असताना वीरमरण आलेले जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील कोळपिंप्री येथील भारतीय सैन्य दलातील १ पॅरा स्पेशल फोर्सचे पॅरा कमांडो जवान रोहित नारायण पाटील (काटे) यांना शुक्रवारी रात्री हजारो नागरिकांनी साश्रुनयनांनी अखेरचा निरोप दिला. अवघ्या नऊ वर्षांच्या देशसेवेनंतर वीरमरण आलेल्या या वीर सुपुत्राचे पार्थिव मूळ गावी दाखल होताच संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले. शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता रोहित पाटील यांचे पार्थिव कोळपिंप्री येथे आणण्यात आले. पार्थिवाचे दर्शन होताच कुटुंबीयांचा आक्रोश पाहून



उपस्थितांचेही डोळे पाणावले. आपल्या वीर सुपुत्राला अखेरचा निरोप देण्यासाठी कोळपिंप्रीसह पंचक्रोशीतील हजारो नागरिकांचा जनसागर गावात लोटला होता. ३०० फूट तिरंग्यासह अंत्ययात्रा गावात पार्थिव दाखल झाल्यानंतर अत्यंत भावपूर्ण वातावरणात अंत्ययात्रेला सुरुवात झाली. तब्बल ३०० फूट लांबीचा तिरंगा फडकावत, देशभक्तीपर गीतांच्या निनादात अंत्ययात्रा मार्गस्थ झाली. गावातील प्रत्येक गल्लीमध्ये नागरिकांनी रांगोळ्या काढून वीर जवानाला आदरांजली वाहिली होती. प्रशिक्षणादरम्यान काळाचा घाला हरियाणा राज्यातील यमुनानगर येथील हथिनीकुंड बॅरेज येथे लष्कराच्या पूर-बचाव प्रशिक्षणादरम्यान ही दुर्दैवी घटना घडली. प्रशिक्षण सुरू असताना मोटरबोटीच्या इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने बोट उलटली. या दुर्घटनेत जवान रोहित पाटील यांना वीरमरण आले. गुरुवारी त्यांच्या निधनाची बातमी कोळपिंप्री येथे पोहोचताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला. शासकीय इतमामात मानवंदना अंत्यसंस्कारस्थळी भारतीय सैन्य दलातील जवानांनी शासकीय इतमामात रोहित पाटील यांना लष्करी मानवंदना दिली. जवानांच्या शिस्तबद्ध सलामीने उपस्थितांचे मन हेलावून गेले. विविध क्षेत्रातील मान्यवर, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि ग्रामस्थांनी पुष्प अर्पण करून वीर जवानाला श्रद्धांजली वाहिली. रात्री आठ वाजता रोहित पाटील यांच्या पुतण्यासह त्यांचा मुलगा हर्षदीप यांच्या हस्ते पार्थिवाला अग्निडाग देण्यात आला. वडिलांना अखेरचा अग्निडाग देताना चिमुकल्या हर्षदीपला पाहून उपस्थित हजारो नागरिकांचे डोळे पाणावले. अत्यंत भावुक वातावरणात ‘शहीद जवान रोहित काटे अमर रहे!’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पालकमंत्र्यांसह मान्यवरांची उपस्थिती वीर जवानाच्या अंत्यसंस्कारासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, अमळनेरचे आमदार अनिल भाईदास पाटील, डीवायएसपी विनायक कोते, प्रांताधिकारी मनीषकुमार गायकवाड, पारोळ्याचे तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, पोलीस निरीक्षक दीपक पाटील, माजी सैनिक निलेश पाटील यांच्यासह विविध शासकीय अधिकारी, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.